माहिती हवीय?

ज्ञानेश्वर महाडीक, महाड.

□ आनंद बक्षींना आदरांजली वाहताना लताबाईंनी एका मुलाखतीत म्हटलंय की, बक्षीसाहेबांची *इन्तकाम*मधली गाणी त्यांना आजही आवडतात. त्या चित्रपटातली कोणती गीतं बक्षीसाहेबांनी लिहिली होती?

— *इन्तकाम* या चित्रपटाचे गीतकार आनंद बक्षी नव्हते त्यांनी या चित्रपटासाठी एकही ओळ लिहिलेली नाही. गीतकार राजेंद्र कृष्ण यांनी *इन्तकाम*ची सगळी गीतं लिहिली होती.

अनिकेत कोळी, नवघर.

□ भाग्यश्रीचा पहिला चित्रपट कोणता? दिग्दर्शक कोण? तिने कोणकोणत्या नायकांबरोबर काम केलं? भाग्यश्री चित्रपटांत पुनरागमन करतेय ही बातमी खरी आहे का?

— १९८९चा *मैंने प्यार किया* भाग्यश्रीचा पहिला चित्रपट. सूरज बडजात्या या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. *मैंने प्यार किया*नंतर तिने *पायल* व *कैद में है बुलबुल* या दोन चित्रपटात भूमिका केल्या. *मैंने प्यार किया*मध्ये सलमान खान तिचा नायक होता आणि *पायल* व *कैद में है बुलबुल* या दोन चित्रपटात तिचा पती हिमालय तिचा नायक होता. कमल अगरवाल यांच्या *माँ संतोषी माँ* चित्रपटातून भाग्यश्री हिंदीत पुनरागमन करतेय.

□ शोमा आनंदचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण होता? दिग्दर्शक कोण? चित्रपट किती साली प्रदर्शित झाला होता?

— पहिला चित्रपट १९७६चा *बारुद*. नायक ऋषी कपूर, दिग्दर्शक प्रमोद चक्रवर्ती.

रविकांत साखरे, कुंभारतळे.

□ *चिमण्यांची शाळा, शुभमंगल, पायगुण, या सुखांनो या, आज झाले मुक्त मी, आता होती गेली कुठे, येडा की खुळा* या चित्रपटांतील नायक-नायिका कोण? दिग्दर्शक कोण? हे चित्रपट किती साली प्रदर्शित झाले?

— *चिमण्यांची शाळा* १९६२ला आला होता. नायक-नायिका राजा गोसावी व सीमा. दिग्दर्शक अनंत माने. १९६४ला हा चित्रपट *ऊठ मराठ्या ऊठ* या नावाने नव्याने सेन्सॉर करून पडद्यावर आणला गेला होता. *शुभमंगल* १९५४ला होता. नायक-नायिका सूर्यकांत शुभा खोटे, दिग्दर्शक अनंत माने. *पायगुण* १९८३ला आला होता. नायक-नायिका कुलदीप पवार, उषा नाईक. दिग्दर्शक अरुण कर्नाटकी. *या सुखांनो या* १९७५ला आला होता. नायक-नायिका रमेश देव-सीमा. दिग्दर्शक राजदत्त. *आज झाले मुक्त मी* १९८६ला आला होता. नायक-नायिका विक्रम गोखले-मधु कांबीकर, दिग्दर्शक राजदत्त. *आता होती गेली कुठे?* १९९१ला आला होता. नायक-नायिका अजिंक्य देव-अंजली वळसंगकर, दिग्दर्शक लक्ष्मीकांत कर्पे. *येडा का खुळा?* १९९१ ला होता. नायक-नायिका लक्ष्मीकांत बेर्डे-वर्षा उसगावकर, दिग्दर्शक दत्ता केशव.

मंदार विचारे, मालवण.

□ निळू फुले यांनी किती हिंदी चित्रपटांत काम केलं? त्यांनी कोणकोणत्या मराठी चित्रपटांत नायकाच्या भूमिका केल्या?



— *भयानक, सौ दिन सास के, रामनगरी, कुली, मशाल, जरा सी जिंदगी, सूत्रधार* या हिंदी चित्रपटात निळू फुलेंनी भूमिका केली. *थापाड्या सामना, चोरीचा मामला, हऱ्या नाऱ्या झिंदाबाद, माणसापरीस मेंढरं बरी, सोयरिक, बन्या बापू, सोबती* हे निळूभाऊंनी नायकाची भूमिका केलेले मराठी चित्रपट.

□ शुभा खोटेने कोणकोणत्या हिंदी चित्रपटांत नायिकेची भूमिका केली? तिचे नायक कोण होते? कोणत्या चित्रपटापासून चरित्र भूमिका केल्यात? किती मराठी चित्रपटांत भूमिका केल्या?

— *देख कबीरा रोया* (दलजीत), *दादी* (सुनील दत्त), *नाचघर* (अनुपकुमार), *रोड नं. ३०३* (मेहमूद) या हिंदी व *शुभमंगल, रानपाखरं* (सूर्यकांत), *या मालक* (मेहमूद), *चिमुकला पाहुणा* (रमेश देव) या मराठी चित्रपटात शुभा खोटे नायिकेच्या भूमिकेत चमकली. *चटकचांदणी, हिचं काय चुकलं?, माझा पता करोडपती* या मराठी चित्रपटात तिने सहाय्यक भूमिका केल्या. *उमज पडेल तर* या मराठी चित्रपटात पाहुणी कलाकार म्हणून तिने पडद्यावर फक्त एक गाणं गायिलं होतं.

शिल्पा दांडेकर, रायगड.

□ चित्रपटांत आजवर कोणकोणत्या प्राण्यांनी काम केलं आहे? चित्रपटांना प्राणी कोण पुरवतं?

— प्राणी अनेक आहेत. पण त्यातले लक्षात राहिलेले प्राणी म्हणजे वाडियांच्या अनेक चित्रपटातील घोडा, पंजाब का बेटा विजय भट्ट यांच्या चित्रपटातला छोटा राजपूत, *हाथी मेरे साथी*मधील रामू हत्ती, *गाय और गौरी*मधील गाय, *तेरी मेहरबानियाँ* मधला कुत्रा, *मुझे जीने दो*च्या वेळी सुनील दत्तने एक घोडा विकत घेऊन पाळला होता आणि नंतर तो घोडा इतर चित्रपटांसाठी भाड्याने देऊन तो पैसे मिळवत होता. तर वासननी *इन्सानियत* या चित्रपटासाठी चिम्पॅंझी जातीचे एक माकड परदेशाहून आणले होते. दिलीपकुमार-देव आनंद यांच्या *इन्सानियत*मध्ये प्रमुख भूमिका होत्या. तरीही या चित्रपटातील झिप्पी या माकडाची अधिक जाहिरात करण्यात आली होती.

मंदार विचारे, मालवण.

□ चित्रपटांशी संबंधित कोणकोणते पुरस्कार सध्या दिले जातात. भारतातील चित्रपटविषयक सर्वोच्च पुरस्कार कोणता आहे? जीवनगौरव पुरस्कार कोणत्या निकषांवर दिला जातो?

— भारतात चित्रपट पुरस्कारांची संख्या सध्या इतकी वाढत चाललीय की, ते पाहून उद्या प्रत्येक गल्लीबोळात चित्रपटविषयक एक पुरस्कार तर दिला जाणार नाही ना, अशी शंका सध्या येऊ लागलीय. तरीही जे पुरस्कार आहेत त्यातल्या प्रमुख पुरस्कारांचा विचार करायचा झाला तर राष्ट्रीय पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, फिल्मफेअर पुरस्कार, अल्फा गौरव पुरस्कार, स्क्रीन पुरस्कार, म.टा.सन्मान, लता मंगेशकर पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार या पुरस्कारांचा विचार करता येईल. या पुरस्कारातील सर्वोच्च पुरस्कार म्हणजे राष्ट्रीय पुरस्कार. जीवनगौरव पुरस्कार देताना कोणाही कलावंताची चित्रपटव्यवसायातील प्रदीर्घ कारकीर्द प्रथम पाहिली जाते. ●